(०२३४६) चेअरमन २२६२५५ \ सीईओ

# पलस सहकारी बँक लि: पलस

प्रधान कार्यालय : ५५५ / अ , मेन रोड , पलस -४१६३१०.

www.palusbank.com

जावक नं ः ५६/५४३ दिनांक ः २०/१०/२०२०

## परिपत्रक क. १८/२०२०-२१

**संदर्भ ः** १) RBI/ २०२०-२१/१६ DOR N0.BP.BC/३/२१.०४.०४८/२०२०-२१
दि ०६/०८/२०२०
२) RBI/ २०२०-२१/१७/DOR. N0.BP.BC/४/२१.०४.०४८/२०२०-२१
दि ०६/०८/२०२० रोजीचे परिपत्रक
३) RBI/ २०२०-२१/३४/DOR N0.BP.BC/१३/२१.०४.०४८/२०२०-२१
दि ०७/०९/२०२० रोजीचे परिपत्रक

**विषय ः कोरोना विषाणू संसर्गामुळे अडचणीत आलेल्या कर्जदारांसाठी कर्जाचे पुर्नगठन धोरण.**
(Resolution Framaework for Covid-१९)

**प्रस्तावना ः**

भारतासह संपूर्ण जगामध्ये कोरोना या विषाणूचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर सुरू आहे. मार्च २०२० पासून महाराष्ट्रासह सर्व भारतात कोरोना विषाणूचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत आहे. भारत सरकारने दिनांक २४.०३.२०२० पासून दिनांक ३१.०५.२०२० पर्यंत संपूर्ण देश लॉकडाऊन केला. त्यानंतरही राज्य सरकारने लॉकडाऊन/ अनलॉक इ. सारखे निर्देश दिले. महाराष्ट्रात अद्याप अनलॉक सुरू आहे. कोरोना विषाणूचे संसर्गामुळे सर्वच उद्योग, व्यापार, कारखानदारी, शेती व्यवसाय यावर मोठया प्रमाणात विपरीत परिणाम झाला आहे. उद्योग, व्यापार, व्यवसाय पुर्णतः बंद होते. त्यामुळे कर्जदारांचे उत्पन्न पूर्ण पणे बंद झाले. संपूर्ण अर्थव्यवस्था ठप्प अशी परिस्थिती निर्माण झाली. कर्जदार उत्पन्न नसल्याने अडचणीत आले. या सर्व बाबींचा विचार करून रिझर्व बँकेने दिनांक ०१.०३.२०२० ते ३१.०८.२०२० या कालावधीतील हप्ता, व्याज भरणेस कर्जदारांना मोरॅटोरियम कालावधी देणेस परवानगी दिली. त्याप्रमाणे आपल्या बँकेच्या कर्जदारांना वर नमूद कालावधीचा मोरॅटोरियम कालावधी दिलेला आहे. तथापी अद्याप कोरोना विषाणूचा संसर्ग थांबलेला नाही. उद्योग, व्यापार व्यवसाय पुर्ण क्षमतेने सुरू नाहीत.

या आर्थिक संकटात कर्जदारांना सहाय्य होण्यासाठी उपाययोजना म्हणून कर्जदारांची कर्जखाती पुनर्गठन करणेबाबत रिजर्व बँक ऑफ इंडीया ने वरील दिनांक ०६.०८.२०२० रोजीचे परीपत्रकाने सर्व च बँकाना मार्गदर्शक रिझॉलेशन फ्रेमवर्क Resolution Framework For covid १९ संबंधीत मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार दिनाक १ मार्च २०२० रोजी जे कर्ज खाते उत्तम जिंदगी वर्गवारी मध्ये होते व त्यांचेवर कोव्हीड १९ चे माहामारीमुळे संकट आलेले आहे अशा कर्जदारांसाठी प्रत्येक बँकेने सदर

परीपत्रकाचे अनुषंगाने कर्जदारांसाठी कर्ज पुर्नगठन धोरण तयार करणेविषयी सुचना केलेली आहे. त्याप्रमाणे आपल्या बॅंकेच्या दिनांक २९.०९.२०२० रोजी झालेल्या मा.संचालक मंडळ सभेमध्ये कर्जदारासाठी कर्ज पुर्नगठन धोरण तयार करणेत आलेले असून त्यास covid १९ अंतर्गत कर्ज पुर्नगठन कर्जधोरण असे संबोधण्यात येईल.सदर धोरणात रिझर्व बॅंकेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे खालील बाबींचा समावेश आहे.

**कर्ज पुर्नगठन धोरण ठरविणेचा उददेश ः** सदर धोरणाचा मुख्य उददेश हा बॅंकेकडील कर्ज खाती ही १ मार्च २०२० रोजी उत्तम जिंदगी म्हणुन वर्गवारी मध्ये वर्गीकृत आहेत तसेच १ मार्च २०२० रोजी ३० दिवसापेक्षा जास्त दिवस थकबाकी मध्ये नाहीत अशा वैयक्तीक कर्ज, इतर कर्ज व एम एस एम ई ( MSME ) सेक्टरमध्ये समावेश असणा-या कर्जदारांना त्यांची कर्जखाती पुनर्गठण करण्याची सुविधा देऊन त्यांचेवरील covid १९ विषाणुमुळे निर्माण झालेला अर्थिक ताण/ अडचण कमी करणेस सहाय्य करणे असा आहे.

**कर्ज पुर्नगठन व्याप्ती व पात्रता (Scope and Applicability) ः**

१) कर्ज पुर्नगठन धोरण हे व्यक्ती व इतर पात्र कर्जदारांना अटी पुर्ण करणेचे अटीवर लागू असेल. सदर धोरणामधील भाग अ वैयक्तीक कर्जासाठी आणि भाग ब इतर पात्र कर्जदारांचे संबधीत आहे . भाग क एम एस एम इ सेक्टरनुसार देण्यात आलेल्या कर्जाबाबत आहे. भाग ड मध्ये सदर कर्ज पुर्नगठन धोरणानुसार सुविधा दिलेल्या कर्जाची अंमलबजावणी करताना पुर्ण कराव्या लागणा-या अटी व नियम यांचा समावेश आहे. त्याचबरोबर भाग ई मध्ये बॅंकेने सदर धोरणानुसार अंमलबजावणी केलेबाबतची प्रकटीकरण करावयाची माहिती आहे.

२) खालील कर्जे सदर कर्ज पुर्नगठन धोरणानुसार पुर्नगठनासाठी पात्र असणार नाहीत.

अ) मास्टर डायरेक्शन दिनांक ७ जुलै २०१६ मधील परीच्छेद कमांक 6 – 1 मधील दिलेल्या यादीप्रमाणे शेती कर्ज व यासारख्या सुचनेस अनुसरून देण्यात आलेली कर्जे. सोबत सदर मास्टर डायरेक्शनची प्रत जोडली आहे.

ब) प्राथमिक शेती केडीट संस्था, शेती सेवा संस्था आणि आदीवासी बहुउददेशिय यासारख्या संस्थाना शेतक-यांना शेतीसाठी कर्जपुरवठा करणेसाठी देण्यात आलेली कर्जे

क) अर्थिक सेवा देणा-या संस्थाना दिलेली कर्जे

ड) केंद्र सरकार, राज्य सरकार, निमसरकारी स्थानिक संस्था आणि संसद किंवा विधानसभा यांचे कायदयाव्दारे निर्माण झालेली कार्पोरेट संस्था यांना देण्यात आलेली कर्जे

इ) केवळ covid १९ ने प्रभावित झालेल्या कर्जदारांनाच सदरचे धोरणानुसार पुर्नगठनाची सुविधा देणेत यईल व सदर योजणेसाठी संदर्भ तारीख ०१.०३.२०२० रोजीच्या कर्ज येणेबाकी रक्कमेचा विचार केला जाईल.

ई) सोनेगहाण/ सोनेगहाण टर्म लोन/ ठेवतारणी कर्जे / लवादी कर्जे दिनांक ०१.०३.२०२० रोजी ३० दिवसांपेक्षा जास्त काळासाठी थकित असणा-या कर्ज खात्यांना सदर योजना लागू नाही.

फ) सदर धोरणानुसार कर्ज पुर्गगठण करताना रिझर्व बॅकेच्या वरील संदर्भीय परिपत्रक क ३ प्रमाणे Debt Service Coverge Ratio ,Average Debt Service Coverage Ratio, Debt Ratio, Total Outstanding Liability, इ. निकषांचे पालन कराणे बंधनकारक असेल.

**भाग-अ- वैयक्तिक कर्जे (Personal Loan )**

१) यामध्ये बॅकेकडून मंजुर करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या व्यक्तीगत / वैयक्तिक दिलेल्या कर्जासाठी योजना लागू असेल. उदा. रहिवाशी स्थावरगहाण कर्जे, वैयक्तीक वापरासाठी वाहनतारण कर्जे, शैक्षणीक कर्जे, शेतीपुरक कर्जे, पर्सनल लोन इ. सदर योजना बॅकेच्या कर्मचारी यांना देण्यात आलेल्या कर्जासाठी लागू असणार नाही.

२) बॅकेकडील जे वैयक्तिक कर्जदार दिनांक १ मार्च २०२० रोजी उत्तम जिंदगी वर्गवारीत असून ३० दिवसापेक्षा जास्त दिवस कालावधीसाठी थकबाकीत नाहीत असे कर्जदार कर्ज पुर्नगठनासाठी पात्र असतील.

३) बॅकेने सदर योजनेनुसार कर्ज पुर्नगठन करणेबावत घेतलेल्या निर्णयाचे तारखेपर्यंत पात्र कर्जदार सातत्याने उत्तम जिंदगी वर्गीकृत असला पाहिजे.

४) कर्जदार यांचे मागणीनुसार बॅकेकडून कर्ज पुनर्गठीत करणेबावतचा निर्णय ३१ डिसेंबर २०२० पूर्वी घेऊन त्याची अंमलबजावणी ९० दिवसाचे आत करावी.

५) या योजनेनुसार कर्ज येणेबाकीचे पुनर्गठन आकारण्यात आलेले किंवा येणे असलेल्या व्याजाचे रूपांतर इतर कर्ज सुविधेमध्ये किंवा मोरॅटोरियम देणे यासारख्या बाबींचा समावेश असेल. त्यासाठी कर्जदाराचे उत्पन्नाचा विचार करण्यात येईल त्यासाठी कमाल दोन वर्षे कालावधी अधीन असेल. त्या अनुषंगाने कर्जाच्या एकूण परतफेड मुदतीत सुसंगत बदल करण्यात येईल . मंजूर मोरॅटोरियमच्या कालावधीवावतची अंमलबजावणी तारखेपासून तात्काळ लागू होईल.

६) सदर धोरणानुसार कर्जदाराने पुढील अटी पूर्ण केल्या तरच पुर्नगठनची अंमलबजावणी झाली असे समजण्यात येईल.

अ) कर्जदाराने योजनेनुसार अमंलबजावणीसाठी मागणीसह आवश्यक कागदपत्रे व करारपत्र बॅंकेस करून देणे उदा. कर्ज पुर्नगठन मागणी अर्ज, चालू आर्थिक पत्रके, तारण उतारे, करारपत्र इ.

ब) कर्जाचे अटी व शर्ती यामध्ये झालेल्या बदलाची नोंद बॅंकेकडील रेकॉर्डमध्ये करण्यात येईल.

क) बॅंकेच्या मागणी नुसार कर्ज पुर्नगठनासाठी कर्जदार नवीन अटींची पुर्तता करेल.

**<u>भाग ब - इतर कर्जे (OTHER EXPOSURES)</u>**

१) सदरचा भाग हा अ भागामध्ये समावेश नसलेल्या व MSME सेक्टरमधील २५ कोटी पर्यंतची सर्व कर्जे वगळता इतर कर्जासाठी लागू असेल.

२) सदर योजनेसाठी जी कर्ज खाती १ मार्च २०२० रोजी उत्तम जिंदगी म्हणून वर्गीकृत असून ३० दिवसापेक्षा जास्त दिवस थकबाकी मध्ये नाहीत अशी कर्ज खाती पात्र असतील तसेच सदरची स्थिती सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या वेळी असणे आवश्यक आहे.

३) कर्जदारांचे विनंतीनुसार सदर धोरणानुसार कर्ज पुर्नगठनाचा निर्णय घेतला ती तारीख मंजूरीची समजणेत येईल.

४) कर्जदाराने मल्टीपल वित्तीय संस्थाकडून कर्ज घेतले असेल तर सदर धोरणानुसार अंमलबजावणीसाठी वित्तसंस्था पैकी कर्जदाराचे एकूण येणेबाकी पैकी ७५% आणि एकूण कर्जपुरवठा केलेल्यापैकी ६०% वित्तिय संस्थानी कर्ज पुर्नगठन निर्णय घेणे आवश्यक असेल.

५) या योजनेमध्ये कर्ज पुर्नगठन कर्जाबाबत दिनांक ३१ डिसेंबर २०२० पूर्वी निर्णय घेऊन सदर निर्णयाची अंमलबजावणी निर्णय घेतले पासून १८० दिवस पर्यंत करण्यात येईल.

६) एकापेक्षा जास्त वित्तिय संस्था कंपनी यांच्याकडून कर्जपुरवठा (सहभाग कर्जे) करणेत आला असेल तर सदर कर्जास या धोरणानुसार अंमलबजावणी करताना आपले बॅंकेसह इतर वित्तीय संस्थानी निर्णय घेतले पासून ३० दिवसाच्या आत इंटरनल केडिट ॲग्रीमेंट सहया करणे आवश्यक राहील.

७) सदर योजनेनुसार निर्णय घेण्यात आलेला आहे. मात्र एकुण कर्जे येणेबाकीच्या ७५ % कर्ज सुविधा असलेल्या आणि एकुण वित्तीय संस्थापैकी ६० % संस्थांनी निर्णय घेतलेपासून ३० दिवसाचे आत सहया केल्या नाहीत तर सदरचा निर्णय रद्द समजण्याचा असून संबंधित कर्जदाराबाबत सदर योजनेअंतर्गत पुन्हा निर्णय घेतला जाणार नाही

८) Internal Credit Agreement (ICA) वर सहया करणाऱ्या बॅंकामधील सदर योजनेअंतर्गत प्रोसेसमधील तरतूदीबाबतचे कोणतेही विवाद यामध्ये रिझर्व बॅंक मध्यस्थी करणार नाही वित्तीय संस्था यांचेकडून आय सी ए मध्ये विवाद निराकरण करणेसाठीच्या यंत्रणेचा समावेश केला जाईल.

९) सदर धोरणानुसार योजनेची अंमलबजावणी एकत्रित सर्व वित्त पुरवठा करणा-या संस्थांना लागू असेल वित्तीय संस्थाकडून आय सी ए मध्ये अंमलबजावणी पूर्वीची व नंतरची संपूर्ण माहिती सोईस्कररित्या उपलब्ध व शेअर करणे बाबतच्या यंत्रणा यांचा समावेश करणेत येईल

१०) उपरोक्त कोणत्याही निर्देशाचे उल्लंघन केल्यास संबंधीत कर्जदाराच्या संदर्भातील सर्व योजनेबाबतची प्रकिया लागू होणे त्वरीत थांबवण्यात येईल सदर योजनेची अंमलबजावणीच्या मुदतीचा भंग न करता करण्यात येईल

**भाग क ः Micro, Small and Medium Enterprises सेक्टरमधील कर्जे ः**

आपल्या बॅंकेमार्फत MSME सेक्टरला देण्यात आलेल्या कर्जासाठी COVID 19 मुळे उदभवलेल्या परिस्थितीत सदर सेक्टरला मदत किंवा सहाय्य करण्यासाठी खालील अटींवर कर्ज पुर्न घटित करण्याचे धोरण ठरविण्यात आलेले आहे त्यानुसार सध्या MSME वर्गीकृत असणारी बॅंकेकडील उत्तम जिंदगीतील कर्जखाती डाऊन ग्रेड न करता पुर्नबांधणी / पुर्नगटित करता येतील

१) ज्या कर्जदाराचे बॅंकेकडील एकत्रित कर्ज दिनांक १ मार्च २०२० रोजी रू २५ कोटीपेक्षा कमी आहे अशा कर्जदारांचे कर्ज पुर्नबांधणी/ पुर्नगठनासाठी पात्र असेल.

२) संबंधित कर्ज खाते दिनांक १ मार्च २०२० रोजी उत्तम जिंदगी वर्गीकृत असणे आवश्यक आहे

३) कर्ज खातेची पुर्नबांधणी / पुर्नगठीत बाबतची अंमलबजावणी दिनांक ३१/०३/२०२१ पूर्वी करण्यात यावी.

४) कर्जदारांची फर्म किंवा संस्था कर्ज खाते पुर्नगठित करण्याची अंमलबजावणी करणे दिवशी सदर फर्म किंवा संस्था यांनी GST रजिस्ट्रेशन केलेचे असणे आवश्यक राहील मात्र सदरची अट ज्या MSME उदयोगांना GST रजिस्ट्रेशन मधून वगळण्यात आले आहे अशा सर्व कर्ज खातेसाठी शिथील असेल. याबाबत दिनांक १ मार्च २०२० रोजीचे अस्तित्वात असलेल्या नियमाप्रमाणे अंमलबजावणी राहील.

५) पुर्नगठित करणेत आलेल्या कर्ज खातेचे उत्तम जिंदगी म्हणून असलेले वर्गीकरण सदरचे कर्ज २ मार्च २०२० ते पुर्नघटित बाबतची अंमलबजावणी केलेल्या दिवसापर्यंतच्या कालावधीत जरी एनपीए झाले तरी संबंधीत कर्ज उत्तम जिंदगी म्हणून वर्गीकृत करण्यात येईल

६) पुर्नगठित केलेल्या कर्ज रक्कमेवर यापूर्वी जरी तरतूद करण्यात आली असली तरी नवीन जादा ५% तरतूद करण्यात येईल

७) बॅंकेमार्फत वितरीत केलेल्या वरील अटी पूर्ण करणा-या MSME कर्ज खात्यांना सदर योजनेचा लाभ देता येईल. यामध्ये नजरगहाण कर्ज, औद्योगिक नजरगहाण कर्ज, व्यवसायिक वाहनतारण

कर्ज, कॅश केडिट कर्ज, स्थावरगहाण CRE, CRE + RH इत्यादी थोडक्यात MSME मध्ये व्यवसायिक कारणासाठी दिलेल्या सर्व कर्ज खात्यांचा समावेश होईल.

८) सदर सर्व सूचना दिनांक ११ फेब्रुवारी २०२० रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे राहतील

## भाग ड - Permiteed Features of the Resolution Plan: कर्ज पुर्नगठनासाठी आवश्यक बाबी व वैशिष्ठये ः

१) सदर धोरणानुसार COVID 19 नुसार कर्जदाराचा आर्थिक ताण कमी करणेसाठी अतिरिक्त पत सुविधा मंजूर करणे या बाबीचा समाविष्ठ करण्यात येईल त्यासाठी विदयमान कर्जाचे नुतनीकरण केले नसणे आवश्यक आहे.

२) बॅकेकडून कर्जाचे परतफेडीचा कालावधी वाढवण्यास परवानगी देता येईल सदर कालावधी मोरोटोरियम किंवा विना मोरोटोरियमसह दोन वर्षापेक्षा जास्त दिला जाणार नाही मोरोटोरियम कालावधी सदर योजनेच्या अंमलबजावणीपासून सुरू होईल.

## E) Other Feathers- इतर वैशिष्ठे

१) सदर योजनेनुसार कर्ज खाते सहभाग किंवा मल्टीपल बॅकींग अंतर्गत असेल तेव्हा योजनेनुसार अंमलबजावनीनंतर कर्जदाराने दिलेल्या सर्व रिबेट व सर्व परतफेड रक्कमा तसेच जादाचे कर्ज रक्कमेचे वितरण या प्रकारचे इतर काही या योजनेचा कोणताही भाग असेल तो सर्व बॅकांपैकी एका बॅकेने इस्को खातेवर व्यवस्थापीत करून त्याव्दारे पाठविण्यात येईल.

२) उपरोक्त व्यवहार सहजतेने पार पाडले जाणेसाठी बॅक व इस्को मॅनेजर यांचेत सामान्य करार करणेत येवून त्यामध्ये दोहोंच्या कर्तव्य व जबाबदारी याचा उल्लेख केलेला असेल

## F) जिंदगी वर्गीकरण व तरतुदी ः Asset Classification & Provisioning :

१) सदर पुर्नगठन धोरणानुसार योजनेच्या निर्णयापासून अंमलबजावणीपूर्वी तरलतेसाठी अंतर्गत अधिकचा कर्जपुरवठा कर्जदारास केला असला तरी अंमलबजावणी होईपर्यंत सदरचे कर्ज उत्तम जिंदगी म्हणून वर्गीकरण करता येईल.

२) पुर्नगठन बाबतची अंमलबजावणी झालेली नसेल तर अधिकचा करण्यात आलेल्या कर्जाची वर्गवारी IRAC नियमाप्रमाणे करावी.

३) या सुविधेच्या तरतुदीचे पालन करून योजना लागू केली असल्यास कर्जदाराचे कर्जखाते उत्तम जिंदगी मधून खालच्या वर्गवारीत गेले असले तरी सदर योजनेच्या अंमलबजावणी तारखेस उत्तम जिंदगी म्हणुन

श्रेणी सुधारणा केली जाईल.

४) वैयक्तिक/ व्यक्तीगत कर्जदाराचे बाबतीत कर्ज पुर्नगठन सुविधा देताना बॅंकेकडून अंमलबजावणीचे तारखेपासून तरतूदी ठेवण्यात येतील अशी तरतुद कर्ज रकमेच्या १०% प्रमाणे अंमलबजावणीनंतर करणेत येईल.

५) वैयक्तिक कर्जाशिवाय इतर कर्ज बाबतीत MSME अंतर्गत ची कर्जे वगळता सदर योजनेची अंमलबजावणीसाठी Internal Credit Agreement (ICA) वर ३० दिवसाचे आत बॅंकेने सही केलेली असेल तर अंमलबजावणी तारखेपासून तरतूदी ठेवण्यात येतील. कर्ज पुर्नगठन केलेल्या एकूण कर्ज रकमेच्या १०% प्रमाणे तरतूद अंमलबजावणीनंतर करण्यात येईल.

६) बॅंकेने Internal Credit Agreement वर ३० दिवसाच्या आत सही निर्णय तारखेपासून केली नाही .त्यावेळेस ३० दिवसाचा कालावधी संपलेल्या तारखेदिवशी २०% प्रमाणे कर्ज रकमेवर तरतूद करण्याची आहे. किंवा IRAC निकषाप्रमाणे करावी लागणारी यापैकी जी जास्त असेल त्याप्रमाणे तरतूद करण्याचे आहे .जरी बॅंकेने निर्णय घेऊन मान्य केले असेल . मात्र आय सी ए वर सही केली नाही तरी २०% प्रमाणे कर्ज रकमेवर बॅंकेकडून तरतूद करण्यात येईल.

७) दिनांक १७/०४/२०२० रोजीच्या रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडिया यांचे परिपत्रकाप्रमाणे बॅंकेकडून संबधित कर्जदार यांचे बाबत तरतूद केली असेल व ती रिव्हर्स केली नसेल तर सदरच्या तरतूदीचा वापर या कर्ज पुर्नगठन सुविधा अंतर्गत कराव्या लागणा-या तरतूदीसाठी करता येईल. मात्र सदर बाब MSME अंतर्गत कर्जासाठी लागू असणार नाही.

**G ) तरतूद फिरविणे - REVERSAL OF PROVISION**

१) वैयक्तीक कर्ज / पर्सनल लोन बाबत कर्ज पुर्नगठन सुविधा घेतलेल्या कर्जदाराने कर्जाची २०% रक्कम खाते पुर्नगठित केल्यानंतर एनपीए न होता परतफेड केलेस तरतुदीपैकी निम्मी तरतुदीची रक्कम रिव्हर्स करण्यात येईल. तसेच राहिलेली तरतूदीची निम्मी रक्कम कर्जदाराने पुर्नगठित कर्जखात्याची आणखी १०% रक्कम परतफेड केल्यानंतर खाते एनपीए न होता केली तरच सदरची तरतूदीची रक्कम रिव्हर्स करण्यात येईल.

२) इतर पुर्नगठन कर्जाच्या बाबतीत Internal Credit Agreement (ICA) वर बॅंकेने सही केली असेल तर वरील एक प्रमाणे तरतूदीचे नियमाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात येईल. तथापि Internal Credit Agreement (ICA) सही केली नसेल तर कर्जाचे रकमेची २०% परतफेड झालेनंतर निम्मी तरतूद रक्कम

अधिकची १०% परतफेड झाल्यावर निम्मी तरतूद रक्कम IRAC निकषास आधीन राहून रिव्हर्स करण्यात येईल.

H] अंमलबजावणीनंतर करावयाची कार्यवाही

१. वैयक्तीक कर्ज / पर्सनल लोन बाबत सदर योजनेच्या अंमलबजावणीचे अटीनुसार दिलेल्या कर्ज पुर्न गठन सुविधेबाबत दिनांक ०१.०७.२०१५ रोजीच्या Prudential Norms on Income Recognition, Asset Classification and Provisioning Pertaining to Advances बाबतच्या मास्टर सर्क्युलर प्रमाणे कर्जाचे वर्गीकरण केले जाईल.

२. इतर पुर्नगठन कर्जाचे बाबतीत MSME अंतर्गत कर्जे वगळून आय सी ए वर बॅंकेने स्वाक्षरी केलेला कर्जदार कोणत्याही कारणांनी डिफॉल्ट झाला तर मॉनिटरींग पिरीयडच्या ३० दिवसात सदर कर्ज खातेचा आढावा घेवून निर्णय घेतला जाईल.

३. मॉनिटरींग पिरीयड विचारात घेताना अंमलबजावणी तारखेपासून पुर्नगठीत कर्जाची १०% पर्यंत कर्ज रक्कम परतफेड करेपर्यंतचा कालावधी त्यासाठी व्याज किंवा मुद्दल प्रथम जमा करण्यास सुरूवात झाल्यापासून कमीत कमी एक वर्षाचा कालावधी ज्यात कर्जासाठी देण्यात आलेला जास्तीचा मोरॅटोरियम कालावधी असेल.

४. कर्जदार आय सी ए वर सही केलेल्या एकाही वित्तीय संस्थेची आढावा कालावधीत थकित झाला तर सदर कर्जाचे सर्व वित्तीय संस्थांनी वर्गीकरण जरी आय सी ए वर सही केली नसली तरी योजनेच्या अंमलबजावणी दिवशीपासून एनपीए वर्गीकरण डाऊनग्रेड करण्यात येईल किंवा ज्यादिवशी कर्जदार अंमलबजावणी पूर्वी वर्गीकरण ज्या तारखेला झाला असेल या दोहोपैकी जी अगोदर असेल त्या तारखेपासून करण्यात येईल.

५. सर्व बाबतीत पुढील अपग्रेडेशेन नवीन पुर्नघटना अधीन असेल.

६. मोरॅटोरियम कालावधी एनपीए वर्गवारीत न जाता पूर्ण केलेनंतर सदर कर्ज खातेस दिनांक ०१.०७.२०१५ च्या मास्टर सर्क्युलरचे निकष लागू राहतील.

७. या योजनेस अनुसरून करण्यात आलेल्या तरतुदी कायम ठेवण्यात येतील व त्या खालील कारणासाठी उपलब्ध असतील.

या योजनेची अंमलबजावणी लागू केल्यानंतर कर्ज खाते एनपीए वर्गीकरण झाले तर

I] प्रकटीकरण आणि पत अहवाल Disclosure and Credit Resourses

१. बॅकेकडून सोबत दिलेल्या नमुना अ प्रमाणे तपशील किमान दर तिमाही प्रसिध्द करण्यात येईल. सदरचा तपशील दिनांक ३१.०३.२०२१, ३०.०६.२०२१, ३०.०९.२०२१ चे अखेरीस सादर करणेचा आहे. त्याचबरोबर बॅकेकडून सोबत दिलेल्या तक्ता ब प्रमाणे प्रत्येक सहामाहीस उदा , ३० सप्टेंबर व ३१ मार्च ला सादर करण्याचा असून पहिल्या सहामाहीची सुरूवात ३० सप्टेंबर २०२१ पासून होईल. त्यापासून सदर योजनेअंतर्गत अंमलबजावणी करण्यात आलेली सर्व खाती पूर्ण परतफेड होईपर्यंत किंवा संपूर्ण एनपीए झालेनंतर यापैकी लवकर असेल तोपर्यंत सादर करण्यात येईल.

२. बॅकेच्या वार्षिक आर्थिक पत्रकामध्ये सदर बाबतचे प्रकटीकरण इतर आवश्यक प्रकटीकरणासह करण्यात येईल.

३. या धोरणाच्या सुविधेसह अनुसरून कर्ज खाते पुर्नगठीत केलेली असल्यास कर्जदाराचे क्रेडीट रिपोर्टींग या धोरणा अंतर्गत Restructured म्हणून वर्गीकृत करण्यात येवून Credit Reporting Company संमधीत कर्जदाराचा पत इतिहास पुर्नगठीत खात्यास लागू असणा-या धोरणानुसार संचलित राहील.

J] इतर माहीती Other Information

१. सदर योजनेनुसार पुर्नगठित कर्जाची माहिती सर्व शाखांनी सोबत जोडलेल्या Format A विहीत नमुन्यात ३१ मार्च २०२१, ३० जुन २०२१ व ३०/०९/२०२१ या तिमाहीची तिमाही संपताच ७ दिवसात प्रधान कार्यालयास पाठवावी.

२.तसेच सदर योजनेनुसार पुर्नगठित कर्जाची माहिती सर्व शाखांनी सोबत जोडलेल्या Format B विहीत नमुन्यात ३१ मार्च २०२१ व ३०/०९/२०२१ या सहामाहीची सहामाही संपताच ७ दिवसात प्रधान कार्यालयास पाठवावी

.३. सदर धोरणाची अंमलबजावणी दिनांक ०१/१०/२०२० पासून करणेत येईल.

४. सदर धोरणानुसार कर्जदार यांचे खातेस मुदतवाढ देणे, परतफेडीस मोरॅटोरियम देणे, थकित कर्ज मुद्दल व व्याज यांचे परतफेडीचे नवीन हप्ते बांधून देणे, आवश्यक असेल तर उत्पन्नाचा विचार करून अधिकचे कर्ज मंजूर करणे यासारख्या बाबींचा समावेश असून प्रत्येक कर्जदारास आवश्यकतेनुसार छाननी करण्यात येऊन त्यास संचालक मंडळ सभेता मंजूरी घेण्यात येऊन अंमलबजावणी करण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू

मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रत माहितीसाठी ः
पलुस विभाग / सांगली विभाग,
सर्व शाखा.